तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमाच्या संनियंत्रण व अंमलबजावणीसाठी निर्माण करण्यात आलेली अस्थायी पदे पुढे चालु ठेवण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः तिक्षेवि-२०१३/प्र.क्र.५८/का.१४४४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०९ ऑक्टोबर, २०१७.

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांकः इपीडी-१०१०/प्र.क्र.३१२/का.१४२१ दि. १४.१२.२०१०
२) शासन निर्णय क्रमांकः तिक्षेवि-२०११/प्र.क्र.९७/का.१४४४ दि. ०४.०१.२०१२
३) शासन आदेश क्रमांकः तिक्षेवि-२०१३/प्र.क्र.५८/का.१४४४ दि. १५.०३.२०१७.

शासन निर्णय :-

तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात आलेल्या विकास आराखड्यातील कामांचे सनियंत्रण व अंमलबजावणी या साठी अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आस्थापनेवर संबंधित विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयासाठी निर्माण करण्यात आलेल्या खालील ९ अस्थायी पदांना संदर्भाधीन क्र. ३ येथील दि. १५.३. २०१७ च्या शासन निर्णयान्वये दि. ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

सदरहू ९ अस्थायी पदांना, दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

योजनेचे नाव	कार्यालयाचे नाव	पदनाम व वेतनश्रेणी	पदसंख्या
श्रीक्षेत्र देहू,आळंदी,भंडारा डोंगर,नेवासा, पालखीतळ मार्ग विकास आराखडा,	विभागीय आयुक्त, पुणे	विशेष कार्य अधिकारी (रु.१५६००-३९१००+ग्रेड पे रु.६६००)	१
		संशोधन सहायक (रु.९३००-३४८००+ग्रेड पे रु.४३००)	१
		लिपिक-टंकलेखक (रु.५२००-२०२००+ग्रेड पे रु.१९००)	१
श्रीगजानन महाराज समाधी शताब्दी महोत्सव शेगाव विकास आराखडा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज श्रीक्षेत्र मोझरी, जिल्हा अमरावती, विकास आराखडा	विभागीय आयुक्त, अमरावती	विशेष कार्य अधिकारी (रु.१५६००-३९१००+ग्रेड पे रु.६६००)	२
		संशोधन सहायक (रु.९३००-३४८००+ग्रेड पे रु.४३००)	२
		लिपिक-टंकलेखक (रु.५२००-२०२००+ग्रेड पे रु.१९००)	२
		एकूण पदे	९

उपरोक्त पदांच्या वेतन व भत्यांवर होणारा खर्च "मागणी क्र. ओ-८, ३४५२, पर्यटन, ०१, पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, १०१, पर्यटन केंद्रे," या लेखाशिर्षाखालील संबंधित उपशिर्षांतर्गत खर्ची टाकून, सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाच्या (०१) वेतन, या उद्दीष्टाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदरहू शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/आ.पु.क. दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००९१५५८५५५८१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Maya Roop Vasudeo
Date: 2017.10.09 15:49:12 +05'30'

(मा. रु. वासुदेव)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
३) विभागीय आयुक्त, पुणे /अमरावती विभाग
४) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/अमरावती
५) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रशासकीय इमारत,वांद्रे (पूर्व ,मुंबई-५१)
६) वित्त विभाग (व्यय-८)/वित्तीय सुधारणा/आ.पु.क, मंत्रालय,मुंबई
७) नियोजन विभाग-का-१४२४/का-१४२१/का-१४२७ मंत्रालय,मुंबई
८) निवड नस्ती, का.१४४४, नियोजन विभाग, मुंबई.
